# मानस पूजा

Manas Puja — Worship Made in the Mind · Vishwanath

> मानस पूजा केली । हरिची मानस पूजा केली ।
>
> रत्नजडित नवद्वार सिंहासनी । आत्ममूर्ति बसविली ॥धृ॥

प्रेम भक्तीचे जळी न्हाऊ घातली । ध्यान वसन नटविली ॥
मानस पूजा केली ॥१॥

शुभ चित्ताचे सुगंधी चंदन । मळवट लाविली भाळी ॥
मानस पूजा केली ॥२॥

ज्ञानवेलीची फुलले तोडुनी । माळ गळा शोभविली ॥
मानस पूजा केली ॥३॥

वैराग्याचे चक्र सुदर्शन । शोभे हरिकरकमळी ॥
मानस पूजा केली ॥४॥

धूप दीप नैवेद्य आरती । प्राणज्योति उजळली ॥
मानस पूजा केली ॥५॥

विश्वनाथ म्हणे भाविकजन हो । सेवा ही आवडली ॥
मानस पूजा केली ॥६॥